# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad

## Date : 09 June 2023

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी औरंगाबाद

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक : ०९ जून २०२३ दुपारी १.०० वा.

****

भारताने प्रशासनात क्रांतिकारी बदल करण्यासाठी आणि सेवा वितरणात सुधारणा करण्यासाठी, तंत्रज्ञानाचा स्वीकार केल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. तंत्रज्ञानाच्या वाढीसाठी गेल्या नऊ वर्षातले लेख, व्हिडिओ, ग्राफिक्स आणि माहिती पंतप्रधानांनी आज ट्विटरवर शेअर केली. तंत्रज्ञानाने लोकांच्या जीवनात कार्यक्षमता आणि सोयी आणल्या आहेत, आणि डिजिटली सशक्त भारत निर्माण करण्यासाठी प्रयत्न वाढवले असल्याचं त्यांनी नमूद केलं.

****

भारताने गेल्या नऊ वर्षांत झपाट्याने परिवर्तन पाहिलं आहे, आता मतांच्या राजकारणाऐवजी कामाचं राजकारण होत असल्याचं, भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत भाजपच्या नवीन कार्यालयाची पायाभरणी करताना ते आज बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केवळ सरकारचं कार्यच नव्हे तर देशातल्या राजकारणाची संस्कृतीही बदलली असल्याचं ते म्हणाले. भाजपच्या विचारसरणीमुळे इतर सर्व पक्ष विचलित होत असून, भाजपशी सामना करण्यासाठी कम्युनिस्ट पक्षानेदेखील काँग्रेसशी हातमिळवणी केली, अशी टीका नड्डा यांनी केली.

****

महाराष्ट्रातल्या लोधी, लिंगायत, भोयर पवार, झांडसे या आणि इतर मागासवर्गीय जाती, केंद्रीय यादीत सुचीबद्ध करण्याची प्रक्रिया, राष्ट्रीय मागासवर्ग आयोग राबवत असल्याची माहिती, आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांनी दिली. नवी दिल्लीत महाराष्ट्र सदनात पत्रकार परिषदेत ते काल बोलत होते. गेल्या सहा महिन्यात राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाकडून केलेल्या कामांची त्यांनी यावेळी माहिती दिली.

****

सर्वोत्कृष्ट विद्यापीठांच्या यादीत येण्यासाठी राज्यातल्या सर्व विद्यापीठांनी आवश्यक गुणात्मक सुधारणा करावी, असे निर्देश उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत. काल मुंबईत यासंदर्भातल्या बैठकीत ते बोलत होते. शासकीय वसतिगृहातल्या विद्यार्थ्यांची सुरक्षा, विद्यापीठ महाविद्यालयांची स्थिती आणि सुधारण्यासाठी आवश्यक उपाययोजना, राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, नियामक परिषद इत्यादी विषयांचा आढावा या बैठकीत घेण्यात आला.

****

नांदेड रेल्वे विभागाच्या व्यवस्थापक नीति सरकार यांनी काल परतूर, सेलू आणि मानवत रोड रेल्वे स्थानकांची पाहणी केली. अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत या तिन्ही रेल्वे स्थानकांवर आणखी काय प्रवासी सुविधा वाढवता येतील, यासंदर्भात त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

****

हिंगोली जिल्ह्यात औंढा नागनाथ इथं एसटी बस, कार आणि दुचाकीत झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले. काल दुपारी ही घटना घडली. एसटी बसचे ब्रेक निकामी झाल्यानं बसने कार आणि दुचाकीला धडक देऊन हा अपघात झाला.

****

हिंगोली जिल्ह्यातल्या उगम ग्रामविकास संस्था या ठिकाणी `मिरची : उत्तम कृषी पद्धती` या विषयावर काल कार्यशाळा घेण्यात आली. महाराष्ट्र शासनाचा सहकार आणि पणन विभाग, महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्प आणि बी. पी. जी. फार्मर प्रोड्युसर कंपनी यांच्या संयुक्त विद्यमानं घेण्यात आलेल्या या कार्यशाळेत जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी मार्गदर्शन केलं. शेतकऱ्यांनी विविध प्रशिक्षणातून नवीन तंत्रज्ञान आणि माहिती जाणून घेऊन त्याचा वापर शेतीत करावा, तरच शेती समृद्ध होईल, मिरची ही मानवाची दररोजची गरज असून मिरचीची लागवड शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरेल, असं जिल्हाधिकारी म्हणाले.

****

इंग्लंड इथं सुरु असलेल्या क्रिकेट विश्वचषक कसोटी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात आजच्या तिसर्या दिवशी भारत पाच बाद १५१ धावांपासून पुढे खेळणार आहे. अजिंक्य रहाणे २९, तर के एस भरत पाच धावांवर खेळत आहे. काल ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव ४६९ धावांवर संपुष्टात आला. मोहम्मद सिराजनं चार,

शार्दुल ठाकूर आणि मोहम्मद शमीनं प्रत्येकी दोन गडी बाद केले. भारत सध्या ३१८ धावांनी पिछाडीवर आहे.

****

जपान मध्ये सुरु असलेल्या महिला कनिष्ठ आशियाई हॉकी स्पर्धेत भारतीय संघानं उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. काल झालेल्या सामन्यात भारतीय संघानं चीनी तैपेई संघाचा ११- शून्य असा पराभव केला.

****

अरबी समुद्रात निर्माण झालेलं बिपरजॉय चक्रीवादळ उत्तरेकडे सरकत असल्याचं भारतीय हवामान विभागानं सांगितलं. यामुळे गुजरातच्या तटवर्ती भागात हवामान विभागाकडून अतिदक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. हे वादळ गोव्यापासून ८२० किलोमीटर, मुंबईपासून ८४० तर पोरबंदर पासून ८५० किलोमीटर अंतरावर आहे. दक्षिणी गुजरात आणि सौराष्ट्र च्या काही भागांमध्ये १३ जून पर्यंत पाऊस होण्याची शक्यता देखील हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

दरम्यान, मराठवाड्यासह कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उद्यापासून तीन दिवस वादळी वाऱ्यासह मध्यम ते हलका पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

//************//